## <u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>

नि.फौ.ख.क्र. ६२/२००१

सरकार –वि– शब्बीर खान

नि.क्र.१७

## <u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – पुरुषोत्तम दादाराव शेळके,

वय. ५१ वर्षे, व्यवसाय – शेती,

राहणार – भोनगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

## <u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>

१. आरोपी शब्बीर खान याला मी ओळखत नाही. पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता कधी व कोठे बोलविले होते हे मला माहिती नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष भाऊराव झाडे यांच्याकडून कोणतेही दस्त जप्त केले नव्हते. मी राजाराम रामभाऊ झाडे यांना ओळखतो. राजाराम झाडे याच्यासोबत काय घडले होते याबाबत मला माहिती नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष कोणतीही लिखापडी केली नव्हती. पोलीसांनी माझ्या सह्या घेतल्या होत्या की काय हे आता मला आठवत नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र.२ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता **नि.क्र.१८** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>. <u>उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत</u> :–**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८.०१.२००० रोजी पोलीस निरीक्षक एम. बी. खडगे यांनी मला बुलडाणा सहकारी संस्था मर्यादीत शेगाव येथे पंचानामा करण्याकरीता बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी भाऊराव नारायण झाडे हे सुध्दा हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष बचत खाते उघडण्याचा फॉर्म, १३१९३/– रुपये जमा करण्याचा फॉर्म, बचत खात्यामधून पैसे काढण्याचा फॉर्म व इत्यादी दस्ताऐवज जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा माझ्या समक्ष तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला बघितले असल्यामुळे त्याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे

आरोपीला शिक्षेपासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०९.०२.२०२६ | दि.०९.०२.२०२६ |